# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## ट्राईबटेक समूह उद्योजकता प्रतिष्ठान - (ट्रायसेफ) नवसंशोधन केंद्र

एम.आई.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली - ४४२६०५ महाराष्ट्र (भारत)

जा. क्र. गोवि/ट्रायसेफ/२०२६/११७ दिनांक: ०६/१०/२०२६

### परिपत्रक

**विषय: सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज २०२६ मध्ये गोंडवाना विद्यापीठ परिक्षेत्रातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी नोंदणी करण्याबाबत.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने गोंडवाना विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील सर्व शिक्षक, प्राचार्य, विद्यार्थी तसेच नवउद्योजक व संबंधितांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत विद्यार्थ्यांमधील नाविन्यपूर्ण विचार, सर्जनशीलता, समस्या निराकरणाची क्षमता तसेच उद्योजकतेला चालना देण्याच्या उद्देशाने **सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज २०२६** चे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर चॅलेंजच्या माध्यमातून कृषी, गृह कायदा आणि सुव्यवस्था, महिला आणि बालविकास, आरोग्य आणि वैद्यकीय सेवा, शाश्वतता (उर्जा, हवामान आणि इतर), पायाभूत सुविधा आणि गतीशिलता, उदयोन्मुख तंत्रज्ञान, विज्ञान आणि संशोधन, संरक्षण, नगरविकास इत्यादी विविध १० क्षेत्रांतील ५० विषयांवर विद्यार्थ्यांना आपल्या नाविन्यपूर्ण संकल्पना व उपाययोजना सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. उत्कृष्ट व निवडक नाविन्यापूर्ण संकल्पनांना रु. ५ कोटींपर्यंत आर्थिक सहाय्य मिळण्याची संधी उपलब्ध आहे.

याअनुषंगाने सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज २०२६ नोंदणी करण्याकरीता अर्ज करण्यासाठी अंतिम दिनांक १७/१०/२०२६ आहे. सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज २०२६ मध्ये नोंदणी करण्याकरीता **http://sevainnovationchallenge.in/** या लिंकव्दारे अर्ज सादर करावे. ही बाब सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी, ही नम्र विनंती.

धन्यवाद !

**प्रा. मनिष द. उत्तरवार**
संचालक न. न. व सा. तथा ट्रायसेफ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

SEVA FIRST INNOVATION CHALLENGE 2026 | RATAN TATA MAHARASHTRA STATE SKILLS UNIVERSITY | कौशल्यम् बलम् | सत्यमेव जयते | महाराष्ट्र शासन | Maharashtra State Innovation Society

# सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज

## 23 सप्टेंबर ते 17 ऑक्टोबर 2026

**"सृजनशीलता, गुंतवणूक आणि नाविन्यतेचे हे पर्व आहे. नव्या युगातील युवाशक्ती विकसित भारताच्या पायाभरणीसाठी महत्त्वाची भूमिका बजावेल."**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

| खालील क्षेत्रांमधून नाविन्यपूर्ण उपाययोजना सुचवा | |
|---|---|
| 1. कृषी | 6. आरोग्य आणि वैद्यकीय सेवा |
| 2. गृह, कायदा आणि सुव्यवस्था | 7. शाश्वतता (ऊर्जा, हवामान आणि इतर) |
| 3. महिला आणि बालविकास | 8. पायाभूत सुविधा आणि गतिशीलता (वाहतूक) |
| 4. नगरविकास | 9. उदयोन्मुख तंत्रज्ञान |
| 5. संरक्षण | 10. विज्ञान आणि संशोधन |

**वरील नमूद १० क्षेत्रातील प्रत्येक मध्ये ५ उपक्षेत्रात असे ५० विषयांवर प्रतियोगिता असणार.**

## विजेत्यांना 5 कोटी रुपयांची वित्तीय सहाय्यता मिळणार

**संकल्पना सादरीकरण अंतिम दिनांक:**
**१७ ऑक्टोबर २०२६**

नोंदणीसाठी

http://sevainnovationchallenge.in/

लागू होणारे नियम

## कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, महाराष्ट्र राज्य